# सुशासन

## (तत्वे आणि पद्धती)




संपादक

**डॉ. नितीन गौरखेडे**

**डॉ. मुक्ता सोमवंशी**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# सुशासन

## (तत्वे आणि पद्धती)

संपादक

डॉ. नितीन गौरखेडे
डॉ.मुक्ता सोमवंशी

आधार पब्लिकेशन्स, अमरावती

Sonpeth
Pin-431516

# सुशासन

**(तत्वे आणि पद्धती )**

■ **डॉ. नितीन गौरखेडे**
**डॉ.मुक्ता सोमवंशी**

■ प्रथम आवृत्ती – २५ , **डिसेंबर २१)**

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN-** 978-93-91305-63-5

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख / लेखक | पु.क्र. |
|---|---|---|
| 1 | सुशासनाच्या भुमिकेत झालेला बदल<br>प्रा.डॉ.एम.एफ.राऊतराहे | 1 |
| 2 | सुशासन आणि महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम<br>प्रा. सुरेशलक्ष्मण शहापुरे | 8 |
| 3 | राज्य का आधार सुशासन की अवधारणा एक अध्ययन<br>डॉ.टी.एल.मिर्झा | 12 |
| 4 | सुशासन : उगम आणि विकास<br>प्रा.डॉ. नितीन दादाराव गौरखेडे | 25 |
| 5 | सुशासन की लोकतांत्रिक संकल्पना<br>डॉ. मनीष कुमार साव | 28 |
| 6 | सुशासनः समस्या एवं उपाय<br>प्रा.डॉ.कोनेरू बाबन्ना डुमलवाड | 34 |
| 7 | सुशासनातील अडथळे<br>प्रा डॉ.आंधळे बी.व्ही. | 40 |
| 8 | सुप्रशासन समस्या व उपाय<br>सौ.प्राची चैतन्य पाटील | 47 |
| 9 | लोकसेवेचा हक्क : सुशासन, सर्वसमावेशक विकास आणि मानवी हक्क<br>डॉ. संदीप भि. काळे | 53 |
| 10 | सुशासन से प्रशासनिक दर्शन<br>डॉ कुलकर्णी वनिता बाबुराव | 61 |
| 11 | सुशासनासाठी विरोधी पक्षाची अवश्यकता<br>प्रा. डॉ. विजयकुमार सोन्नर | 67 |
| 12 | सुशासन संकल्पना आणि महत्व<br>देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके | 77 |
| 13 | माहितीचा अधिकार आणि सुशासन<br>प्रा.डॉ.वसंत पांडुरंग सरवदे | 82 |

# सुशासनातील अडथळे

प्रा डॉ.आंधळे बी.व्ही.
राज्यशास्त्र विभाग,कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय
सोनपेठ,जि.परभणी.मो.८८३००६६३५५,bvandhale@gmail.com

**प्रस्तावना:-**शासन(Government)-प्रशासन(Administration)लोकप्रशासन (Public Administration) विकास प्रशासन(Development Administration) आणि आज सुशासन(Good Government) अशा प्रकारे शासन आणि प्रशासनाचा विकास झाला आहे. पूर्वीचे राज्य पोलिसी राज्य (Police State) होते. त्यानंतर कल्याणकारी राज्य(Welfare State) आले आणि आज सुशासन राज्याची संकल्पना पुढे आली आहे. १९९० च्या दशकात एकूणच जागतिक पातळीवर खाजगीकरण(Pravetlization) उदारीकरण(Liberlization) आणि जागतिकीकरण(Globelization) ची प्रक्रिया सुरू झाली. या प्रक्रियेमुळे जगभरात अनेक बदल झाले. त्याचाच एक भाग जागतिक बँकेने आपल्या अहवालात सन १९९२ ला सुशासनची संकल्पना प्रतिपादन केली. याबाबत सुशासन म्हणजे काय? हे स्पष्ट करताना जागतिक बँक आपल्या अहवालात म्हणते, 'परिणाम कारक लोकसेवा, विश्वासाहर्य न्यायव्यवस्था आणि लोकांप्रती उत्तरदायी प्रशासन म्हणजे सुशासन होय'. तसेच डेबिट ऑसबोर्न व ग्लेबलर यांनी आपल्या Reinventing Government या ग्रंथात सुशासन संकल्पनेचा विचार मांडला आहे. नवआर्थिक उदारीकरणाच्या परिस्थितीमध्ये राज्याची भूमिका कोणती आणि शासनाचे कार्य कोणती असावीत याबाबत आपले विचार मांडले आहेत.

सुशासन ही एक नव आधुनिक संकल्पना आहे. असे असले तरी या संकल्पनेचा विकास प्राचीन काळापासून होत आला आहे. प्राचीन ग्रीक राजकीय विचारवंत प्लेटो याने आपल्या 'रिपब्लिक'(Republic) या ग्रंथात आदर्श राज्याची(Ideal State) संकल्पना मांडली आहे. यात त्याने एका तत्त्वज्ञ राजाच्या हाती राज्यकारभार देऊन एक सुशासन निर्माण करण्यावर भर दिला आहे. तो म्हणतो जोपर्यंत तत्वज्ञ राज्यकर्ते होणार नाहीत

किंवा राज्यकर्ते तत्वज्ञानी होणार नाहीत तोपर्यंत समाजातून दुष्ट प्रवृत्ती नष्ट होणार नाही याशिवाय अलेक्झांडर यांनीसुद्धा ज्याचे प्रशासन चांगले ते सुशासन होय; असे म्हटले आहे. तसेच फ्रिमनच्या मते,' कमीत कमी शासन म्हणजे सुशासन'.

भारतीय राजकीय विचारात रामायण, महाभारतातील शांतीपर्व आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्रात या ग्रंथात सुशासनाची संकल्पना आलेली आहे. तसेच महात्मा गांधी यांनी सुद्धा रामराज्याची संकल्पना मांडून सुशासनाची संकल्पनाच अधोरेखित केली आहे. सन १९२९ 'यंग इंडिया' मध्ये लिहिताना महात्मा गांधी म्हणतात, 'समाजातील शेवटच्या नागरिकाला न्याय मिळवून देणे म्हणजे रामराज्य होय'. 'राजा आणि रंक या दोघांना समान अधिकाराची खात्री देणे म्हणजे रामराज्य' किंवा जे राज्य नागरिकांच्या नैतिकतेवर आधारलेले असते त्याला त्यांनी चांगले राज्य म्हटले आहे. यावरून आपणाला असे दिसून येते की, सुशासनाची संकल्पना ही प्राचीन काळात तसेच मध्ययुगीन काळात आणि आज आधुनिक काळात विस्तारत गेली आहे. सध्या भारतात पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस म्हणजे २५ डिसेंबर हा दिवस सुशासन दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

**सुशासनाची संकल्पना :- (Concept of Good Government)** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक देशांच्या शासन व्यवस्थेवर चांगले वाईट परिणाम झाले आहेत. यातून राष्ट्रांचा व्यक्तीच्या जीवनात हस्तक्षेप कमी अधिक प्रमाणात झाला. त्यामुळे मानवी जीवनात जे परिवर्तन झाले त्यातून एक नवी व्यवस्था आकाराला आली. तसेच शासनाच्या कार्यावर, स्वरूपावर व त्याच्या व्यवहारावर सुद्धा जागतिकीकरणाचा परिणाम झाला आहे. याचाच शोध घेत असताना जागतिक बँकेने ज्या राष्ट्रांमध्ये शासन चांगले कार्य करत आहे त्याचे काही निकष ठरवण्यात आले.यामध्ये कायद्याचे अधिराज्य (Rule of Law) लोकशाही शासन(Democratic government) सत्तेचे विकेंद्रीकरण(Power) पारदर्शकता शासन(Transfernt government) व प्रशासनातील उत्तरदायित्व,(Administrative Accountibillyty) माहितीचा अधिकार(Rights to Information) व्यक्तिस्वातंत्र्य, प्रचार व प्रसार माध्यमांना दिले जाणारे स्वातंत्र्य ज्या देशांनी अधिकाधिक प्रमाणात दिले त्या शासनाला सुशासन असे



Late Ramesh ... College Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth Dist. Parbhani

मानण्यात आले. याउलट ज्या राष्ट्रांमध्ये सत्तेचे केंद्रीकरण(Power) भ्रष्टाचार(Corpution) दप्तर दिरंगाई, गोपनीयता, दडपशाही, गरीबी, बेकारी, उपासमार यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागले त्या शासनाला सुशासनाच्या संकल्पनेतून वगळण्यात आले. म्हणून सुशासन ही एक नवीन संकल्पना आहे. या संकल्पनेमध्ये लोकांच्या गरजेनुसार शासनाने आपल्या उद्दिष्ट व कार्यामध्ये बदल करून त्यांना अधिकाधिक सोयी-सुविधा पुरवणे;जनतेप्रती उत्तरदायित्वाची भावना असणे आणि शासन व प्रशासन कार्यात अधिकाधिक पारदर्शकता आणून लोकांना आपले शासन वाटणे यासाठी लोकसहभागाची चळवळ शासन स्तरावर आणणे हे सुशासन या संकल्पनेत अपेक्षित आहे.

आज जगाच्या पाठीवर असे काही देश आहेत की, ज्या देशांनी सुशासन प्रक्रिया राबवून तेथील लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले आहे.यामध्ये इंग्लंड, कॅनडा,क्रोएशिया, सिंगापूर, स्वित्झर्लंड, स्वीडन,नॉर्वे, जपान, दक्षिण कोरिया यासारख्या विविध देशांचा समावेश होतो. याउलट आज असेही काही देश आहेत की, जिथे सुशासन व्यवस्था अस्तित्वात नाही. यामध्ये आफ्रिका व आशिया खंडातील विविध देशांचा समावेश होतो.उदाहरणार्थ इराण, इराक, पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया, येमेन, आफ्रिका खंडातील मॉरिटानिया,माली, लिबिया, सोमालिया, सुदान,जॉर्डन, युगांडा, नायजेरिया, यासारखी अनेक राष्ट्रे आहेत. जिथे सुशासनाची कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. या सुशासनाच्या प्रक्रियेमध्ये अनेक असे घटक आहेत किती जे यातील अडथळे ठरतात याशिवाय सु शासनाच्या प्रक्रियेला आव्हान देणारे काही प्रमुख घटक आपणाला पुढील प्रमाणे सांगता येतील.

**सुशासन निर्मिती मधील अडथळे :-** सुशासन निर्माण होणे आवश्यक आहे. सुशासन निर्माण झाले तर व्यक्तीचे जीवन सुखी व सुसह्य असे होते. परंतु सुशासन निर्मिती होण्यात अनेक अशी अडथळे आहेत. त्यातील काही प्रमुख अडथळे आपणाला पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१)भ्रष्टाचार :-** सुशासन यामधील सर्वात मोठा अडथळा भ्रष्टाचार आहे. भ्रष्टाचारामुळे अनेक देशात शासनाला धोका निर्माण झाला आहे. सन १९९३ पासून 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल इन्स्टिट्यूशन' ही संस्था भ्रष्टाचाराचा जागतिक निर्देशांक(Global Corpution Index) काढते. यात सन २०१९ मध्ये सर्वात भ्रष्टाचारी देश म्हणून सोमालिया,



Parbhani

येमेन,सिरिया, दक्षिण सुदान हे आहेत. तर सर्वात कमी भ्रष्टाचार असणारे डेन्मार्क, न्यूझीलंड, इंग्लंड,सिंगापूर, स्विझरलँड, नॉर्वे हे देश आहेत. भ्रष्टाचाराच्या निर्देशांकामध्ये भारताचा ८० व्या स्थानावर आहे.एकूणच सुशासन निर्माण करण्यामध्ये भ्रष्ट व्यक्ती कडून होणारा भ्रष्टाचार हा सर्वात मोठा अडथळा आहे. भ्रष्टाचार ही प्रवृत्ती जोपर्यंत थांबणार नाही तोपर्यंत सुशासन निर्माण होणे अशक्य आहे.

२) **दडपशाही :-** सुशासन निर्मितीसाठी वर्तमानपत्र प्रसारमाध्यमे यांना मुक्त स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. परंतु अलीकडील काळांमध्ये सुशासन निर्मिती मधील सर्वात महत्त्वाचा अडथळा वर्तपत्र स्वातंत्र्याची होणारी दडपशाही किंवा त्यांची मुस्कटदाबी हे एक आहे. आंतरराष्ट्रीय अशासकीय संस्था 'रिपोर्टर्स विदाऊट बॉर्डर्स' या संस्थेच्या अहवालावरून १८० देशांपैकी ७३% देशात पत्रकारितेवर पूर्णतः व अंशतः अशी बंदी आहे.जवळपास १३२ देशांमध्ये प्रसार माध्यमांची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. केवळ १२ देशात म्हणजे ७% देशात प्रसारमाध्यमांना अनुकूल अशी परिस्थिती आहे. आज जगातील वर्तमानपत्रांना पूर्णतः बंदी असणारे सीरिया, उत्तर कोरिया, तुर्कमेनिस्तान, चीन, जिबूती यासारखे देश आहेत. तर वर्तमानपत्र स्वातंत्र्यासाठी नार्वे, फिनलंड, स्वीडन, डेन्मार्क हे देश अतिशय चांगले आहेत. भारतासारखा देश १८० देशामध्ये १४२ व्या स्थानावर आहे.

३) **राजकीय गुन्हेगारीकरण :-** प्लेटो सारखा राजकीय विचारवंत म्हणतो, 'जोपर्यंय तत्वज्ञ राज्यकर्ते होणार नाहीत किंवा राज्यकर्ते तत्वज्ञानी होणार नाहीत तोपर्यंत समाजातून दुष्ट प्रवृत्ती नष्ट होणार नाही.' म्हणून प्लेटोने विवेक प्रधान प्रवर्ती वर आधारित शासक वर्ग निर्मितीवर भर दिला आहे. परंतु राजकारणात चांगले राज्यकर्ते तयार होण्याऐवजी राजकारणाचे गुन्हेगारीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. राजकीय गुन्हेगारी कारणामुळेच सुशासन निर्मितीमध्ये अडथळा निर्माण होत आहे. भारतासारख्या लोकशाही देशांमध्ये भारतीय कायदेमंडळाच्या लोकसभेतील ५४३ पैकी १७९ म्हणजे ३३% टक्के प्रतिनिधी हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. त्यात ११४ म्हणजे २०% लोकप्रतिनिधींवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. अशा परिस्थितीत सुशासन कसे निर्माण होईल. हा एक प्रश्न आहे तेव्हा

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ज्या देशांमध्ये हुकूमशाही, राजेशाही, लष्करशाही हे शासन प्रकार आहेत. तिथे तर राजकीय गुन्हेगारी करण्याचे प्रमाण अत्याधिक असे आहे.

**४) अडाणी व अज्ञानी लोकांचे शासन :-** देशाचे नागरिकत्व प्राप्त करण्यापासून ते देशातील प्रशासनातील कोणतेही पद प्राप्त करण्यासाठी व्यक्तीला विशिष्ट प्रकारची पात्रता प्राप्त करावी लागते. विशेषतः प्रशासनामध्ये अधिकार पदावर जाण्यासाठी शैक्षणिक पात्रतेची अट नसते. परंतु सार्वजनिक जीवनात किंवा राजकारणात पद प्राप्त करण्यासाठी शैक्षणिक पात्रता असलेली दिसून येत नाही. यामुळे लोकशाही सारख्या शासन व्यवस्थेमध्ये सुद्धा अडाणी व अज्ञानी लोकांच्या हातात सत्तेची सूत्रे जातात एवढेच नाही; तर सामान्यतज्ञ हे विशेषतज्ञांन्वर आपले वर्चस्व गाजवतात. त्यामुळे सुशासन निर्मितीत अडथळा येतो. आजही भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशांमध्ये राजकारणात कोणतीही शैक्षणिक पात्रता नाही. म्हणून भारताचा राज्यकारभार मनावा तसा सुधारला नाही.

**५) मानव विकासाकडे दुर्लक्ष :-** संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम सन १९९० पासून मानव विकास निर्देशांक जाहीर करत आहे यामध्ये विकसित विकसनशील आणि अविकसित असे राष्ट्रांचे वर्गीकरण करण्यात येते जे देश मानव विकास करण्यात अग्रेसर आहेत त्यांना विकसित राष्ट्र म्हणून मानण्यात येते मानव विकास निर्देशांक ठरवण्यासाठी काही निकष वापरले जातात या यामध्ये शिक्षण, आरोग्य, राहणीमान दरडोई उत्पन्न यासारख्या विविध घटकांचा विचार करण्यात येतो सन २०२० मानव निर्देशांक नुसार १८९ देशांमध्ये नार्वे आयर्लंड, स्विझरलँड, हॉंगकॉंग या देशातील मानव निर्देशांक चांगला आहे यामध्ये भारत १३१ व्या स्थानी आहे मानव निर्देशांक ज्या

**६) जनतेची उदासिनता :-** सुशासनाचा मध्ये महत्त्वाचा अडथळा राजकीय उदासीनता हा एक आहे. ज्या देशातील नागरिकांमध्ये राजकीय उदासीनता अधिक प्रमाणात आहे. तिथे सुशासन निर्माण होणे कठीण आहे. आज ज्या देशांमध्ये सुशासन निर्माण झाले; तेथे लोक शासनाच्या विविध विकास कामात व राजकारणात आपला सक्रिय सहभाग नोंदवतात. जोपर्यंत नागरिकांचा विकास कार्यामध्ये सहभाग होणार नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने सुशासन निर्माण होणार नाही. भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

देशांमध्ये मतदान प्रक्रियेमध्ये आजही ५०% टक्क्यापेक्षा अधिक मतदान होत नाही. तसेच मतदानामध्ये जात, धर्म, भाषा, वर्ण, वंश, लिंग, प्रदेश पाहून मतदान करण्यात येते. यामुळे चांगले लोकप्रतिनिधी निवडले जात नाहीत त्यामुळे सुशासन निर्मितीत अडथळा येतो

**७) गोपनीयता :-** शासनाच्या आणि प्रशासनाच्या कार्यामध्ये खुलेपणा, पारदर्शकता, उत्तरदायित्व नसेल तर सुशासन निर्माण होण्यात अडथळा येतो. आजही अनेक देशांमध्ये लोकांना शासन व प्रशासन कार्याची योग्य ती माहिती दिली जात नाही. त्यामुळे शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचत नाहीत. शासन कार्यामध्ये गोपनीयतेवर भर दिला जातो. गोपनीयता राखल्यामुळे विकास कार्यात अनेक अडथळे येतात. आज स्वीडन, नॉर्वे, फिनलंड स्विझरलँड या देशांमध्ये माहितीचा अधिकार सहज उपलब्ध आहे. परंतु भारतासारख्या लोकशाही देशामध्ये जनतेला माहितीचा अधिकार मिळायला २००५ साल उजाडावे लागते तसेच आज माहितीचा अधिकार देऊनही खऱ्या अर्थाने तो अमंलात आणला जात नाही. आजही शासन व प्रशासन जनतेला योग्य ती माहिती उपलब्ध करून देत नाही. यामुळे भारतासारख्या देशात सुशासन निर्माण व्हायला अडथळा येत आहे.

**समारोप :-** सुशासन एक नवा आधुनिक संकल्पना आहे. या संकल्पनेमध्ये शासनाच्या हेतूविषयी अधिक चर्चा होते. जे शासन लोकांना अधिकाधिक निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेते. अधिकाधिक सेवा सुविधा प्राप्त करून देते. तसेच भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, मानवी हक्काचे उल्लंघन, माहिती अधिकाराचा गैरवापर यासारख्या विविध प्रश्न व समस्या निवारण करून कायद्याचे अधिराज्य स्थापन करून आपल्या नागरिकांना कमीत कमी शासनात अधिक अधिक विकास घडवून आणते त्यालाच सुशासन असे म्हणता येईल. यासाठी नागरी सनद (Civil Charter), ई-गव्हर्नन्स (E-GOVERNANCE) , कार्पोरेट सामाजिक दायित्व (Corporate Social Responsibility), माहितीचा अधिकार (Right to Information), सार्वजनिक सेवा गॅरंटी अधिनियम (Public Service Gurnty Act) उपाय करण्यात आले.पण याबाबतीत शासनाची भूमिका प्रामाणिकपणे काम करण्याची असणें आवश्यक आहे.

सुशासनाच्या या प्रक्रियेमध्ये वरील काही प्रमुख अडथळे आपणाला दिसून येतात. याशिवायही अन्य अडथळे सुद्धा आहेत. उदाहरणार्थ बेकारी, दारिद्र्य, उपासमार,

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

निरक्षरता, अनारोग्य, लैंगिक असमानता, न्याय मिळण्यात होणारा उशीर, पर्यावरणाची समस्या अशा अनेक बाबी आहेत. ज्यामुळे सुशासन निर्मिती करण्यात अडथळे येतात. भारतासारख्या देशाला सुशासन निर्मितीमधील सर्वात महत्वाचा अडथळा वाढती लोकसंख्या व गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी लोकांची उपक्रमशील कमतरता हे अडथळे दिसतात.

**संदर्भ सूची :-**

**1.** https://www.wikipedia.com
**2.** https://www.lokasatta.com
**3.** https://www.bbc.com
4. लोकशाही निवडणूका आणि सुशासन – प्रा.बी.बी.पाटील
5. गव्हर्नन्स इन इंडिया – एम.लक्ष्मीकांत
6. सुशासन हे दिवास्वप्न-माधव गोडबोले

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani